## राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक ०८/०९/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

पुणे व कोल्हापूर विभागात काही ठिकाणी तर कोंकण, नाशिक, औरंगाबाद व लातूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि.१ जून ते ०८ सप्टेंबर कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ८७२.४ मि.मी. असून दि.०८ सप्टेंबर, २०२० पर्यंत ९०६.८ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०३.९ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.०८.०९.२०१९ अखेर १०१९.१ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११६.८ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते ०८ सप्टेंबर, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ०१ | नंदुरबार. |
| ४ | ७५ ते १०० % | १५ | ठाणे, रायगड, नाशिक, पुणे, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १८ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया. |

राज्यात दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकुण ३५५ तालूक्यांपैकी २ तालूक्यांत २५ ते ५० %, ३९ तालूक्यात ५० ते ७५ %, १११ तालूक्यात ७५ ते १००% तर २०३ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

### पर्जन्यमान तपशिल (मि.मी) दि.०८.०९.२०२० अखेर



**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर पिवळी खोडकिड, निळे भुंगेरे, मीजमाशी या किडींचा व करपा या रोगाचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, हेलीकोव्हर्पा, उंट अळी व तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

किड व रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतीशाळा, कृषि विद्यापीठाकडील पिक संरक्षण सल्ले, पिक सर्वेक्षणासाठी योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा, बाधित क्षेत्रास तज्ञांच्या भेटी इत्यादी माध्यमातून उपाययोजना करण्यात येत असून, किड नियंत्रणासाठी आजपावेतो विविध योजनांच्या माध्यमातून एकूण-४५,२११ लीटर किटकनाशकांचा पुरवठा करण्यात आला आहे. या अनुषंगाने प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे.

दि.०८.०९.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार ऑगस्ट, २०२० मध्ये पडलेला सततचा पाऊस व किड रोगाचा प्रादुर्भाव होऊन मूग, उडीद, सोयाबीन व संत्रा/मोसंबी या पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये मूग-४५,०६६ हे., उडीद-७,८९० हे., सोयाबीन-१,६२,१६९ हे. व संत्रा/मोसंबी-७,६४१ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. याशिवाय माहे, ऑगस्ट-२०२० मध्ये अतिवृष्टी / पुरामुळे बाधित झालेल्या क्षेत्राच्या प्राथमिक अहवालानुसार १० जिल्हयातील १,७०,८९९ हे., क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये भात, भुईमूग, सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी, हळद, ऊस, मका, भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९८ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर १४३.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.९५%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून १४४.५९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.५४%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.०६.०९.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १३९.४३ लाख हे. (९२.१४%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १३८.२८ लाख हे. (९७.३९%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात खरीप पिकांच्या पेरण्या पुर्णात्वाकडे आहेत. भात व नागली पिके वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहेत. काही ठिकाणी धुळवाफ पेरणी झालेले भात पिक पोटरी ते लोंबी धरणेच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक पोटरी ते फुलोरा तर काही ठिकाणी दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. मूग व उडिद पिके शेंगा भरणेच्या ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणी सुरु आहे. सोयाबीन व भुईमूग पिके फुलोरा, शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते धरणे ते फुले लागणे तर काही ठिकाणी बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी व सुर्यफुल पिके वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.

## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.०८.०९.२०२० अखेर)




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह) (क्षेत्र लाख हे.)



**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. आद्रतेच्या प्रमाणात व तापमानामध्ये वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर ३.९७ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९.९२%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी भात पिक लावणीची कामे अंतिम टप्प्यात आहे. नाचणी पिकाच्या पुर्नलागवडीची कामे झाली आहेत. हळवे व निम गरवे भात पिक फुटव्याच्या ते निसवण्याच्या अवस्थेत आहे. नाचणी पिक वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. याशिवाय तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे पुर्ण होत आली असून, पेरणी झालेली कडधान्ये व तेलबिया पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड, गादमाशी, निळे भुंगेरे या किडींचा व करपा या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. किड नियंत्रणाकरिता एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

**नाशिक विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवामान दमट होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर २०.१९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.२६%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नागली पिकांची पुर्नलागवड पुर्णत्वाकडे आहे. मका पिक तुरे ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा लागणेच्या ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिके दाणे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहेत. भुईमूग पिक फुले ते आऱ्या लागणेच्या अवस्थेत आहेत. बागायती कापूस फुले लागणे ते बोंडे धरण्याच्या अवस्थेत आहे. जिरायती कापूस पाते ते फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी, सुर्यफुल व कारळा पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. बाजरी पिक पोटरी ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. आडसाली ऊसाची लागवड अंतिम टप्प्यात आहे. ज्वारी पिकामध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत. सततच्या पावसामुळे काही ठिकाणी मूग व उडीद पिकांचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर ११.९१ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३७.३५%) पेरणी झाली आहे. विभागात मुग व उडीद पिके शेंगा भरणेच्या ते काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी सुरु आहे. बाजरी व मका पिके दाणे भरणेच्या अवस्थेत आहेत. भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामे झाली असून, पिक वाढीच्या अवस्थेत आहे. तूर पिक फांदया फुटण्याच्या अवस्थेत आहे. भुईमूग व सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहेत. कापूस पिक पाते ते फुले लागणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल पिक फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे. अडसाली ऊस पिकाची लागवड सुरु आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड व गादमाशी या किडींचा, मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, कापूस पिकावर अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. अहमदनगर जिल्हयात मूग पिकावर विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तपमानात वाढ झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.०३ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर ८.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.५८%) पेरणी झाली आहे. विभागात पिकांच्या पेरण्या जवळपास पुर्ण झाल्या असून, पिकांची वाढ समाधानकारक आहे. धुळवाफ पेर झालेला भात पोटरी ते लोंबी धरणेच्या अवस्थेत तर पुर्नलागवडीचा भात व नागली पिक वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत आहे. मका पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.बाजरी पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत असून, लवकर पेरणी झालेले पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा भरण्याच्या अवस्थेत असून, लवकर पेर झालेले पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु झाली आहे. मूग व उडीद पिके शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. घेवडा पिक पक्वता ते काढणीच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. भुईमूग पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे. नवीन अडसाली ऊसाची लावणी चालू आहे. ऊस उगवण ते फुटवेच्या अवस्थेत आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे. कोल्हापूर जिल्हयात पुरामुळे नदीकाठच्या पिकांचे झालेले नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भुईमूग पिकावर हुमणीचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळी, सोयाबीन व मूग पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, भात पिकावर काही ठिकाणी करपा रोगाचा व खोडकिडा आणि तुडतुडे या किडींचा, ऊस पिकावर लोकरी मावा व हुमणी या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर २०.३१ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.४०%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी कणसे भरणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे लागणेच्या ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा लागणे ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. उडीद पिकाची काढणी चालू आहे. मूग पिकाची काढणी व मळणी अंतिम टप्प्यात आहे. कापूस पिक पाते, फुले ते बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक फुले लागणे ते आऱ्या सुटण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे. पिक संरक्षणासाठी कृषि विभागामार्फत उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर ऊंट अळी, गर्डल बीटल, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. तसेच बीड जिल्हयामध्ये कापूस पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवसाचे व रात्रीचे तापमान कमी होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर २८.७३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२.८२%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत तर बाजरी पिक वाढ, पोटरी ते फुलोरा अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा, शेंगा धरणे ते शेंगा भरणेच्या तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मूग व उडीद पिके फुलोरा, शेंगा लागणेच्या तर काही ठिकाणी शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी प्रगतीपथावर आहे. कापूस पिक पाते व फुले लागणेच्या अवस्थेत आहे. तूर पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, उंट अळी, गर्डल बीटल, मका पिकावर लष्करी अळीचा तर कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला. मूग पिकावर विषाणूजन्य रोगाचा तर ज्वारी पिकावर खोडमाशी, मावा व तुडतुडे या किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव दिसून आला आहे. काही ठिकाणी पानथळ जमीनीत निचरा न झाल्याने कापूस पिकाची आकस्मिक मर दिसून येत आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे प्रमाण वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.२४ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर ३१.०० लाख हेक्टर क्षेत्रावर (९६.१८%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस पिक फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. लवकर पेरणी झालेली मूग व उडीद पिके शेंगा पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत तर उशिरा पेरणी झालेली पिके शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. तूर व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर हेलीकोव्हर्पा, तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळी व गर्डल बीटल, कापूस पिकावर रस शेषणाऱ्या किडीचा, अमेरीकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या तर काही ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.०८ सप्टेंबर, २०२० अखेर १९.१४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९.३९%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. कापूस पिक पाते, फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत तर मका पिक फुलोरा ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक फुलोरा ते शेंगा भरणेच्या अवस्थेत आहे. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक वाढ ते पोटरीच्या अवस्थेत आहे. विभागात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरस्थितीमुळे पिकांवर परिणाम झाला आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, भात पिकावर पिवळी खोड किड, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, हेलीकोव्हर्पा, उंट अळी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला. काही ठिकाणी सोयाबीन पिकावर विषाणूजन्य रोग व मुळकूज यारोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. ०८.०९.२०२० पर्यंत पेरणी अहवाल

**क्षेत्र- हेक्टरमध्ये**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.०६/०९/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १४९७४४९ | १४५७१५० | १४९७५४७ | १०० | १०३ | ३ |
| २ | खरीप ज्वारी | ४८२४६१ | २७९३४२ | २७६३७५ | ५७ | ९९ | -१ |
| ३ | बाजरी | ६७१५९५ | ६५२७७८ | ६४०४५० | ९५ | ९८ | -२ |
| ४ | रागी | ९४७३१ | ७८१३४ | ६६६७५ | ७० | ८५ | -१५ |
| ५ | मका | ८३८०६० | ८६०७४५ | ८८१०६६ | १०५ | १०२ | २ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६१ | ३४७३२ | ३५५७२ | ६८ | १०२ | २ |
| **खरीप तृणधान्य** | | **३६३६९५६** | **३३६२८८१** | **३३९७६८५** | **९३** | **१०१** | **१** |
| ७ | तूर | १२७५९७१ | १२०६३२९ | १२४६८७२ | ९८ | १०३ | ३ |
| ८ | मुग | ४८३३४७ | ३२४०४७ | ३९४१९९ | ८२ | १२२ | २२ |
| ९ | उडिद | ३५८९५३ | २८७६८० | ३८८५१७ | १०८ | १३५ | ३५ |
| १० | इतर कडधान्य | १००३२८ | ८६०५७ | १२३६२२ | १२३ | १४४ | ४४ |
| **एकूण कडधान्य** | | **२२१८५९९** | **१९०४११४** | **२१५३२१०** | **९७** | **११३** | **१३** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५८५५५५५** | **५२६६९९५** | **५५५०८९४** | **९५** | **१०५** | **५** |
| ११ | भुईमुग | १९८४३५ | १८६४६२ | २००६५३ | १०१ | १०८ | ८ |
| १२ | तीळ | २३६७२ | १०७५१ | ८८७२ | ३७ | ८३ | -१७ |
| १३ | कारळ | १९७२७ | ७३५९ | ७४०२ | ३८ | १०१ | १ |
| १४ | सुर्यफुल | १७९६५ | १२७३७ | १४९५० | ८३ | ११७ | १७ |
| १५ | सोयाबीन | ३८८४६३३ | ३९५४९७५ | ४३२०६७१ | १११ | १०९ | ९ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८३६ | ६३३८ | ५८६१ | ४२ | ९२ | -८ |
| **एकूण तेलबिया** | | **४१५८२६८** | **४१७८६२२** | **४५५८४०९** | **११०** | **१०९** | **९** |
| **१७** | **कापूस** | **४१८३८०१** | **४३८१९०४** | **४२२३८३७** | **१०१** | **९६** | **-४** |
| **एकूण पेरणी क्षेत्र** | | **१४१९७६२५** | **१३८२७५२०** | **१४३३३१४०** | **१००.९५** | **१०४** | **४** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **११५२८५** | **१२५४२७** | **१३** | **१०९** | **९** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३२८०३** | **१३९४२८०५** | **१४४५८५६७** | **९५.५४** | **१०४** | **४** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत